सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# घरच्या घरी करा मूर्तीचे विसर्जन

- -
शनिवार, 27 ऑगस्ट 2016 - 02:00 AM IST

**Share Link:** http://www.esakal.com/Tiny.aspx?K=UANCNP

**प्लॅस्टर ऑफ पॅरिस 48 तासांमध्ये विरघळणार**

पुणे - प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीचे नदीमध्ये विसर्जन केल्याने होणारे पाणी प्रदूषण रोखण्यासाठी घरच्या घरी विसर्जन करण्यासाठी पर्यावरणपूरक पद्धती विकसित करण्यात आली आहे. पाण्यात अमोनियम बायकार्बोनेटची पावडर मिसळून त्यात मूर्तीचे विसर्जन केल्यास ती 48 तासांच्या आत विरघळणार आहे. त्यासाठी नागरिकांना मोफत अमोनियम बायकार्बोनेटची (खाण्याचा सोडा) देण्याची सोय महापालिकेने केली आहे.

गणेशोत्सवामध्ये शहरात सुमारे सहा लाख गणेशमूर्तींची घरांमध्ये प्रतिष्ठापना होते. त्यापैकी जवळपास पाच लाख मूर्ती "प्लॅस्टर ऑफ पॅरिस‘च्या असतात. परंतु, प्लॅस्टर ऑफ पॅरिस पाण्यात विरघळत नसल्याने त्यातील रासायनिक द्रव्ये विषारी असल्याने नदी आणि विहिरीतील पाणी दूषित होते. ते रोखण्यासाठी महापालिका, कमिन्स इंडिया, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) यांच्या वतीने घरच्याघरी गणेशमूर्तींचे विसर्जन करता येईल, अशी पद्धती विकसित करण्यात आली आहे. त्याचे प्रात्यक्षिक शुक्रवारी सादर करण्यात आले. त्या वेळी महापौर प्रशांत जगताप, कमिन्स इंडियाचे रवीचंद्रन सुब्रह्मण्यम, "एनसीएल‘च्या शुभांगी उंबरकर, महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख सुरेश जगताप उपस्थित होते.

‘घरच्या घरी गणेशमूर्तींचे विसर्जन करता यावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांमार्फत प्रत्येक नागरिकाला दोन किलोची अमोनियम बायकार्बोनेटची पिशवी देण्यात येईल, असे महापौर जगताप यांनी सांगितले.

दरम्यान, या उपक्रमाबाबत नागरिकांना माहिती व्हावी, यासाठी महापालिकेच्या आरोग्य कोठ्या, शासकीय कार्यालये, सार्वजनिक गणेश मंडळे यांच्या माध्यमातून जागृती करण्यात येणार आहे.

1 0

© eSakal.com, all rights reserved